
# मराठी दलित ग्रामीण कादंबरी तुलना

डॉ. निशा भंडारे (पृष्ठ क्र. २३३)



संपादक

**डॉ. भास्कर शेळके**

प्रा. डॉ. निशा भंडारे

सप्रेम भेट

# मराठी दलित ग्रामीण कादंबरी तुलना

संपादक

**डॉ.भास्कर शेळके**

सहयोगी प्राध्यापक आणि मराठी विभाग प्रमुख

श्री शिव छत्रपती महाविद्यालय, जुन्नर (पुणे)

सप्रेम भेट

**शब्दश्री प्रकाशन, जुन्नर**

**Marathi Dalit Gramin Kadmbari Tulana**

**मराठी दलित ग्रामीण कादंबरी तुलना**

संपादक : प्रा.डॉ.भास्कर शेळके

© डॉ.अविनाश भास्कर शेळके

मो.नं.९८९०६८६५२१

**प्रकाशक :**

सौ.तारादेवी भास्कर शेळके

१२१, श्रीदुर्गा, बारव, ता.जुन्नर,

जि.पुणे. ४१० ५०२

मो.नं.९८२२४४८१८१

**प्रकाशन क्रमांक ३**

**प्रथमावृत्ती : २६.७.२०१३**

**मुखपृष्ठ :**

**प्रा.विनायक पारे,** बारामती

**अक्षर जुळणी :**

**श्री.गणेश उर्फ देवव्रत दाजीराम बागल**

बालाजी एंटरप्रायजेस, मंचर (पुणे)

**मुद्रकः**

न्यू भारत प्रिंटर्स, पुणे

मूल्य : रु.४६०/-

ISBN No.: 978 - 81 - 924997 - 2 - 7

◆ अनुक्रमणिका ◆


१. ग्रामीण दलित कादंबरीः तुलनात्मक संस्कृती मीमांसा १३
-डॉ. आनंद पाटील

२. 'तुलनात्मक साहित्यः परंपरा व साहित्य संशोधनाची नव संधी' ३५
-डॉ. राहुल पाटील

३. तौलनिक साहित्य संकल्पना स्वरूप व वैशिष्ट्ये ४१
-प्रा. नंदा कराड

४. तौलनिक साहित्याभ्यासाचे स्वरूप व दलित, ग्रामीण कादंबरी ४६
-प्रा. अपर्णा पांडे

५. दलित साहित्य आणि ग्रामीण साहित्याचा तौलनिक विचार ६१
-डॉ. शशिकांत साळवे

६. 'ग्रामीण' आणि 'दलित' साहित्य : काही साम्यभेद ६५
-डॉ. नानासाहेब सूर्यवंशी

७. दलित - ग्रामीण कादंबरीचा तौलनिक अभ्यास ७०
-प्रा. सुनिता पावडे

८. ग्रामीण व दलित कादंबरी तौलनिक अध्ययन ७५
-प्रा. गणेश मालटे

९. ग्रामीण व दलित कादंबरीचा तुलनात्मक अभ्यास ८१
-प्रा. राजाराम प्रभाकर गावडे

१०. 'ग्रामीण - दलित कादंबऱ्यांचा तुलनात्मक अभ्यास : स्वरुप व दिशा' ८७
-डॉ. रमाकांत कराड

११. मराठी ग्रामीण व दलित कादंबरीः एक तुलनात्मक अभ्यास ९२
-डॉ. प्रवीण ससाणे

१२. ग्रामीण-दलित कादंबरीः तुलनात्मक अभ्यास ९९
-डॉ. धनंजय वाघमारे

१३. ग्रामीण व दलित कादंबऱ्यातील राजकीय स्थित्यंतराचा तौलनिक परामर्श १०३
-प्रा. डॉ. सीताराम निघूट

१४. मराठवाड्यातील ग्रामीण दलित कादंबरी तौलनिक समीक्षा १०६
-प्रा. डॉ. नवनाथ चौधरी

१५. एकविसाव्या शतकातील दोन ग्रामीण कादंबऱ्या : 'जमीन' आणि 'बोडखी' ११४
-डॉ. कीर्ती मुळीक

१६. 'तहान' व 'सूड' या कादंबरीचा तुलनात्मक अभ्यास १२२
-प्रा. माया तानाजी शिंदे

१७. 'हकिकत आणि जटायू', 'जातवन' :
या कादंबरीमधील दलित जीवनाचा वेध १२९
-प्रा.केतकी भोसले
१८. दलित आणि ग्रामीण कादंबऱ्यांचा तुलनात्मक अभ्यास:
मेलेलं पाणी आणि गोतावळा १३३
-डॉ.विजया पाटील
१९. झाडाझडती आणि अस्वस्थनायक तुलना १३९
-प्रा.लता पवार
२०. २००० नंतरच्या ग्रामीण व दलित कादंबरीतील नायकांच्या संघर्षाचे
चित्रणः(बारोमास व राघववेळ) १४७
-प्रा.मीरा देठे
२१. २००० नंतरचे पाडा व कटुसत्य कादंबरीचा सामाजिक व राजकीय तुलनात्मक
अभ्यास १५३
-प्रा. डॉ. शारदा मोरे
२२. दलित-ग्रामीण कादंबरीतील संघर्षमय जीवन सांगणाऱ्या अनुक्रमे कोंडी (बाबुराव
बागूल) व पाचोळा (रा. रं. बोराडे) १६१
-डॉ.सौ.उज्ज्वला देवरे
२३. हाल्या हाल्या दुधू दे! (बाबाराम मुसळे) व श्राद्ध (उत्तम कांबळे)
समाजवास्तव व राजकारणाचा बळी ठरणाऱ्या दोन अस्वस्थ १७२
नायकांची शोकांतिका
-प्रा. अनिता तायडे
२४. बनगरवाडी व फकिरा या कादंबऱ्यांचा तुलनात्मक अभ्यास १७८
-डॉ.किशोर सोनवणे
२५. दलित आणि ग्रामीण कादंबरीचा तौलनिक अभ्यास १८३
('त्रिशंकू'आणि 'मेड इन इंडिया')
-प्रा. कल्पना गावडे
२६. फकिरा व गोतावळा या कादंबऱ्यांचा तुलनात्मक अभ्यास १९३
-प्रा. संदीप भास्कर पाटील
२७. चौथी क्रांती व तणकट या दोन कादंबरीचा तुलनात्मक अभ्यास १९७
-प्रा. डॉ. ज्ञानेश्वर वाल्हेकर
२८. आमदार सौभाग्यवती व 'सभापती' या कादंबऱ्यातील राजकारणाचा
तुलनात्मक अभ्यास २०१
-डॉ. अनिल गर्जे
२९. दलित ग्रामीण कादंबरीतील स्त्रीचे चित्रण : तौलनिक विचार २०५
-डॉ.भास्कर शेळके

३०. मराठी ग्रामीण आणि दलित निवडक कादंबऱ्यांतील स्त्रीचित्रणांचा तौलनिक अभ्यास २१३
-डॉ.संगीता नरेंद्र लांडगे
३१. ग्रामीण आणि दलित कांदबरीतील स्त्री चित्रण : एक तौलनिक अभ्यास २२०
-डॉ.नवनाथ येठेकर
३२. ग्रामीण दलित कादंबरीतील स्त्रियांचे प्रश्न : तुलनात्मक अभ्यास २२४
-प्रा. सौ. मंगल डोंगरे
३३. ग्रामीण व दलित कांदबरीतील स्त्रियांचे चित्रण २२८
-प्रा.मनिषा कांबळे (बनसोड)
३४. ग्रामीण कादंबरी 'इथे मुलांना मरण जन्मता' व 'चक्री' मधील स्त्रीचित्रणाचा तुलनात्मक अभ्यास २३३
-प्रा.निशा भंडारे
३५. ग्रामीण व दलित साहित्यातील स्त्रीजीवन २४३
-प्रा.भाऊसाहेब गव्हाणे
३६. 'निवडक दलित-ग्रामीण कादंबरीतील देवदासी प्रथेचे आर्त चित्रण' २४८
-डॉ.एन.डी.पवार
३७. ग्रामीण व दलित कादंबरीतील स्त्रियांची भाषा २५३
-डॉ. सुनंदा थोरात
३८. चळवळ व ग्रामीण दलित कादंबरी २६०
-प्रा. उमा उत्तम कांबळे
३९. ग्रामीण साहित्य चळवळीत कादंबरीचे योगदान २७१
-प्रा. संदीप चपटे
४०. दलित-ग्रामीण साहित्य चळवळ एक तुलनात्मक विचार २७३
-प्रा. डॉ. जया जितेंद्र कदम
४१. मराठी कादंबरीतील राजकारण संदर्भ आणि सहकार चळवळीचे प्रतिबिंबः एक विवेचन अभ्यास २८०
-डॉ.मधुकर मोकाशी
४२. दलित आणि ग्रामीण साहित्यः लेखिकांच्या कादंबरीचा अभाव कारणमीमांसा २८४
-डॉ.प्रतिमा इंगोले
४३. रंजनवादी/रंजनप्रधान दलित, ग्रामीण कादंबरी २९६
-डॉ.भास्कर शेळके
४४. ग्रामीण आणि दलित कादंबरीतील सामाजिकता एक तुलनात्मक अभ्यास ३०१
-डॉ. अपर्णा साबणे
४५. ग्रामीण दलित कादंबरी आणि समाजपरिवर्तन ३०७
-डॉ.दत्तात्रय गंधारे

४६. 'दलित, ग्रामीण कादंबरीतील सामाजिकता' ३१३
-प्रा.डॉ.गोपीनाथ बोडखे
४७. ग्रामीण व दलित कादंबरी - समाजशास्त्रीय आकलन ३१९
-डॉ. सुभाष आहेर
४८. इंग्रजी वाङ्मयातील दलित ग्रामीण कादंबरीतील व्यथा ३२६
-प्रा.चंद्रकांत मंडलिक
४९. १९८० नंतरची ग्रामीण व दलित कादंबरी ३३१
-प्रा.एस.बी.रणदिवे
५०. १९८० नंतरची दलित व ग्रामीण कादंबरी ३४१
-प्रा.देविदास शेटे
५१. मराठी दलित व ग्रामीण कादंबरीतील बदलत्या जीवनाचे चित्रण ३४५
-डॉ.बाळासाहेब दिघे,
५२. दलित व ग्रामीण कादंबरीची भाषा ३५२
-डॉ. सारीपुत्र तुपेरे
५३. दलित, ग्रामीण जाणिवेचे कादंबरीकार : माधव कोंडविलकर ३६०
-प्रा.सौ.दीपा कुलकर्णी
५४. अण्णाभाऊंच्या कादंबऱ्यांतील ग्रामीण आणि दलित जाणिवा ३६५
- प्रा.राजेश्वर दुडूकनाळे
५५. कादंबरी एक वाङ्:मय प्रकार ३७०
-प्रा.सुभाष अडावतकर .
५६. दलित कादंबरी : संकल्पना व स्वरूप ३७६
-प्रा. सुहास निर्मळे
५७. दलित साहित्य ३८२
-डॉ.चंद्रकांत रूद्राक्ष
५८. समकालीन वास्तव व मराठी कादंबरी/-डॉ. गणेश मोहिते ३८८
५९. ग्रामीण भागातील शैक्षणिक गुणवत्ता सद्यस्थिती आणि उपाय ३९७
-प्रा. दीपक बोचरे
६०. दीक्षाभूमी : सामाजिक, धार्मिक, साहित्यिक चळवळीचे प्रेरणास्त्रोत ४०१
- डॉ.भास्कर शेळके
६१. ग्रामीण व दलित कादंबरीलेखनातील स्त्री साहित्यिकांच्या
अत्यल्प योगदानाचा स्त्रीवादी मागोवा/-प्रा. शोभा नितर ४०५
६२. 'चारापाणी' व 'झावळं' या कादंबऱ्यांचा : एक तुलनात्मक विचार ४१२
-डॉ. उगले ए. बी.
६३. समस्याप्रधान दलित ग्रामीण कादंबरी/प्रा.बाळासाहेब वामनराव सोनवणे ४१८
६४. ग्रामीण दलित कादंबरीतील स्त्री चित्रण/डॉ. दिलीप अलोणे ४२९

# ग्रामीण कादंबरी 'इथे फुलांना मरण जन्मता' व दलित कादंबरी 'चक्री' मधील स्त्रीचित्रणाचा तुलनात्मक अभ्यास :

–प्रा.निशा भंडारे

स्वातंत्र्योत्तर कालखंडामध्ये ग्रामीण आणि दलित साहित्याचा प्रवाह मान्य पावला तो त्याच्या वेगळेपणामुळे. मराठी वाङ्मयात त्यांना महत्त्वपूर्ण स्थान मिळालेले आहे. मराठी साहित्याच्या संशोधन क्षेत्रातही आजपर्यंत ग्रामीण साहित्य आणि दलित साहित्याचा विविधांगी अभ्यास झाला आहे. ग्रामीण दलित कादंबरीतील स्त्री चित्रणाचा तौलनिक अभ्यास प्रधान असल्याने त्यांना केंद्रस्थानी ठेवून विवेचन केले आहे.

## ग्रामीण कादंबरी : 'इथे फुलांना मरण जन्मता' – द.ता.भोसले

द.ता.भोसले हे ग्रामीण साहित्याचे अभ्यासक समीक्षक म्हणून प्रसिद्ध आहे. 'इथे फुलांना मरण जन्मता' ही त्यांची पहिली कादंबरी आहे. ही कादंबरी प्रथम कुलकर्णी ग्रंथाकारच्या पंडितराव कुलकर्णी यांनी प्रकाशित केली. एकूण ११९ पृष्ठांची आहे. नायिका प्रधांन कादंबरी आहे. धर्म आणि मानवी जीवन, धर्म आणि त्याचे कर्मकांडात्मक विधी, तत्त्व आणि आचार, धर्ममूल्ये आणि व्यक्तिविकास यांच्या परस्पर संबंधाविषयी आहे. लेखक स्वतः याविषयी म्हणतात, ''कर्मकांडात्मक धर्मरूप अनेकांच्या ऐहिक जीवनाला करकचून आवळत असते. तेव्हा तर उन्नत करणारा धर्मवीर नि स्वाभाविक स्वरूपात फुलणारे लौकिक जीवन यांच्या नात्यातला पोकळपणा मला अधिक तीव्रतेने जाणवून जातो, मग श्रेयस आणि प्रेयस काय यांचे उत्तर शोधताना मी पार गोंधळून जातो. प्रसंगा प्रसंगाने ठळक होत गेलेल्या स्थूलचिंतनाला शब्दरूप लाभण्यासाठी वास्तव जीवनात एक निमित्त घडले. त्यांच्या मनातील अनेक प्रश्नांचे उत्तर त्यांनी वाचकांवर सोडले आहे. उदा.एखाद्या व्यक्तीने स्वतःची श्रद्धा सफल होण्यासाठी दुसऱ्या व्यक्तीवर ती लादावी का? तसा त्या व्यक्तीचा अधिकार असतो काय? अगदी जन्मदाता असला तरी? माणसाचे लौकिक जीवन श्रेष्ठ की त्या जीवनाला स्थैर्य देण्यासाठी निर्माण केलेला धर्म श्रेष्ठ?''

**कथानक :**

कादंबरीची सुरूवात लेखक त्यांचा मित्र पंडित आपली दिवाळीची सुट्टी संपवून टाकळीवरून दौलतापूरला कॉलेजसाठी जात होते. वाटेत कापशी गावचे नारायण पाटील त्यांच्या मुलीला रमाला शहर दाखवण्यासाठी निघालेले आहेत. गप्पांच्या नादात शहर लवकर आल्याची जाणीव पाटलांना होते. ते मुलीला शहर दाखवायला आलेत असे, सांगतात तेव्हा लेखकाला त्यांचे कौतूक वाटते, नाही तर आपला बाप सदान्कदा शिव्या अन् उपदेश असा विचारही मनात येतो. बापाच्या डोळ्यात अपत्यप्रेम मावत नाही असं उगीचच वाटत. शहरात कुठे राहणार अशी विचारणा केल्यावर पाटील सांगतात, मुक्तीपंथाच्या मठात महाराजांकडे हे ऐकल्यावर लेखक व त्याचा मित्र पंडित आम्हीही तेथेच जेवायला असल्याचं सांगतात. पाटलाला अजूनच आनंद होतो. चालता चालता रमा अनेक प्रश्न विचारते त्यावरूनच तिचा अल्लडपणा जाणवतो. ती फक्त पंधरा-सोळा वर्षांची असते. ७ वी पर्यंत शिकलेली गुडघ्यापर्यंत साडी नेसलेली बालिशपणा चेहऱ्यावरून जाणवतो. तिला शहराविषयी आकर्षण वाटत सात आठ दिवस तिचे वडिलांबरोबर आनंदाने जातात रोज गमती जमती सांगते. खरेदी दाखवते आणि एक दिवस पाटील म्हणतात, ''तुला आवडलयं ना मग इथच राहायच मी गावाला घरी जाणार तू महाराजांच्या सेवेत राहयचं'' हे ऐकल्यावर ती खूप रडते नाही नाही, म्हणते मला आई-आजी-भाऊ आवडतात.

मठामध्ये दामोदर पंत, राजाक्का, भानुमती, यशोदा अनेक सेवक सेविका असतात. मठातील वातावरण रंगेलपणाही दिसतो. पंत स्त्रीलंपट स्वभावाचा आहे तर भानामतीला अनैतिक संबंधातून दिवस जातात ती गर्भ पाडण्यासाठी पैसे मागायला लेखकाच्या रूमवर येते. लेखकाकडे, त्याच्या मित्राकडेही पैसे नसतात. पण काही दिवस ती मठात दिसत नाही. खूप दिवसानंतर परत दिसते. रमाकडून तिने पैसे घेतल्याचे कळते. रमाने गावात काय तरी भानगड केली असेल म्हणूनच पाटलाने आपली लाडकी एकूलती एक मुलगी मठात ठेवली असे विचार दोघांच्या मनात येतात. पण काही दिवसानंतर पाटील परत खरेचसं सामान घेऊन मठात येतो. सगळीकडची आवराआवर झाल्यावर रमाच्या खोलीतून आचार्य, राजाक्का आणि पाटलांचा कुजबुजण्याचा आवाज येतो. मंदिराच्या पायऱ्यांवर दोघं बसून ऐकतात. परंतु रामक्का ऐकत नाही ती म्हणते, स्वामींची

सेवा नको, तेव्हा सगळेजण तिला खोलीत कोंडून ठेवतात. जेवण देत नाहीत. परंतु दोन दिवसानंतर स्वतः रमा तयार होते. भक्तीनींची पूजा केली जाते. त्या सगळ्या गोंधळात उपाशी राहण्याने ती चक्कर येऊन पडते. पाटील पैसा, धनधान्य मठाला पुरवत असल्याने, रमाचे लाड होत असतात. इतर बालकांसाठी ती स्वयपांक घरात जात नाही. पुस्तक वाचत बसते. गावात फेरफटका मारते. विरंगुळ्यासाठी कुत्र्याचं पिल्लू आणते. प्रश्नांवर प्रश्न विचारणारी चौकस कन्या आणि आताची रमा यात जमीन अस्मानाचे अंतर वाटते. तिची बडदास्त ठेवली जाते. राजाक्का खास दिमतीला राहते. पंत वाचनाबद्दल सुचवतात पंत तत्त्वज्ञानाची माहिती देणाऱ्या कथा सांगण्यास सुरूवात केली पण लेखकाने आणलेल्या पुस्तकात तिचा रस असतो. पंत तिचा हात धरतात तेव्हा रमा तितक्याच शांतपणे म्हणते, ''बस्स! झाल समाधान, वाटल्यास हाही हात धरा! दुसराही हात पुढे करते, तुम्हाला बरं वाटत असेल तर, धरा आश्रमात हीच शिकवणूक असते वाटत?'' रमाचा टोला वर्मी लागतो. त्याला मेल्याहुन मेल्यासारख होतं. मुलं अभ्यासात गुंग होतात मार्च महिना जवळ येतो. उन्हाळा मी म्हणू लागतो. वार्षिक परीक्षेची तयारीत अधून मधून मठात वेळ घालवतात रमाला खूप बोलायचं असत तिला अजूनही संसाराची ओढ असते. पंडितला वाटतं हिने एका दृष्टीनं सुतकी जीवन फेकून दिलं. याबद्दल आनंद वाटे पण पुढची पायरी गाठल्या बद्दल विषादही वाटतो. मधल्या काळात सदोबाची जत्रा झाली. कुस्त्याचा फड रंगला रात्री तमाशानं कैफ चढवला. गावात घरात शिकलेली पोरं म्हणुन गांवकरी मान देतात दोघेही चांगल्या मार्कांनी पास होतात. मठातही पेढे घेऊन आले पण रमा दिसली नाही. पंजाबवरून मठात आलेल्या तरुण लखमसिंग व भानुमती बरोबर रात्री अपरात्री फिरताना दिसली. दोघांनी खूप समजावण्याचा प्रयत्न केला. पण रमा बेफान झाली होती. चांगल वाईट तिला कळत नव्हतं. सूडाच्या भावनेने ती स्वतःला वाईट मार्गावर नेत होती. दोघंही बोलत नाही व लखमसिंग बरोबर हिंडलेल आवडत नाही म्हणून ती अधिकच त्यांना हिणवते. तिच्या डोक्यात एकच विचार असतो संसार आणि मूल. तिची आई व्हायची इच्छा अधिकच प्रबळ झाली.

सुधाकर गावातील सधन घरचा मुलगा लेखक व पंडितचा मित्र असतो. त्याच्या साह्याने लखमसिंगला मारतात समज देतात रमाच्या नादी लागू नको. तो घाबरतो महाराजांच्या कानावरही कागाळी करतात त्याला परत

पंजाबला पाठवतात. रमा अधिकच पिसाळते. बदनाम होण्याचे सगळे मार्ग अजमावते. भडक मेकअपमध्ये फिरते आणि एक दिवस राजाक्काला ती आई होणार असल्याच आनंदाने हसत हसत सांगते. मठात स्मशान शांतता पसरते. नारायण पाटलाला तातडीने बोलवतात. सगळे समजावतात ती हट्ट सोडत नाही. सगळ्यांच्या वर संशयाची सुई फिरते आणि शेवटी राजाक्काला स्मरण झालं आणि तिनं म्हटल, अहो, लखमसिंग असावा. मी ही त्याला खूपदा पाहिला रमेबरोबर, अहो तो तसा इरसाल पोरगा होता. पंतान माहिती पुरविली. तिला विचारल्यावर ती गप्प बसते. राजाक्का म्हणाली, अहो, तिला काय विचारता, तोच तो दिवसभरात असायचा रमेबरोबर. पण हे खोट असल्याचं रमा सांगते. तेव्हा पाटील संतापून लाथाबुक्क्याने मारतो मातीत पडलेली रमा किंकाळ्या मारीत आई! आई! मेले गं, मला कुणीतरी वाचवा हो. म्हणून टाहो फोडते, हुंदके देते, तेव्हा पाटील गरजतात. आता सांग? वाचा उघड तुझी. एवढं मन ताब्यात नव्हत तुझ्या. इतका निमूटपणे मार खाणारी रमा आवेशाने बोलते, तुमचं तरी असतं ताब्यात? या वयात सुद्धा तुम्हाला संसार करावासा वाटतो. मग मी तर तरुण आहे. मला नाही वाटत करावा? का नाही लग्न केलं माझ? का घातल मला नरकात अन् माझी फसवणूक केली. मी तुमचं काय पाप केलं होत?

महाराज ह्या प्रसंगातून सोडण्याचा रामबाण उपाय करतात. राजाक्काच्या कानात काहीतरी बोलतात आणि जालीम औषध आणायला सांगतात. राजाक्का रमाला औषध म्हणून देते अन् रमाचा मृत्यू होतो. पाटलानं म्हणलेल खरं ठरलं होत. लेखकाने व त्याच्या मित्राने पंडितने मठाचं जेवणं सोडलं मठाकडं पाठ फिरवली.

### दलित कादंबरी : 'चक्री' – भीमसेन देठे

भीमसेन देठे एक प्रथीतयश कवी, कथाकार, नाटककार, कादंबरी लिहिणारे दलित साहित्यिक म्हणून प्रसिद्ध आहेत. त्यांची चक्री ही कादंबरी संस्कृती प्रकाशनाच्या सुनिता राजे पवार यांनी प्रकाशित केली. एकूण २६८ पृष्ठांची आहे लेखकाच्या मनात लहानपणापासून दगडी या स्त्रीच करारी व्यक्तिमत्त्व खोलवर रुतलेल होतं ते आधी कथारूपाने १९८७ मध्ये दिवाळी स्त्री विशेषंकात दगडी नावाने प्रसिद्ध झालं. वाचकांना आवडलं यानंतर १९९४ सालच्या



महाराष्ट्रातील जळगांव येथे पेटलेल्या वासनांकांडाच्या किती तरी स्त्रियांची आयुष्ये उद्ध्वस्त झाली. वाढलेला उपभोगवाद, हिंसाचार विध्वंस थांबणार कधी? ह्या प्रश्नांच्या आक्राळ विक्राळ चक्रात 'चक्री' ची निर्मिती झाली. समग्र स्त्री जात दलितांपेक्षाही दलित आहे.

**कथानक :–**

कथेला सुरूवात होते ती मुंबई मधून निवेदन तृतीय पुरुषी आहे. पवार गुरुजींच्या सूत्रानुसार कादंबरीला सुरूवात होते. एस.टी.चा प्रवास, मुंबईचे महानगरीय वातावरण गुरुजी विचारांच्या तंद्रित स्वतःशीच पुटपुटतात सेहचाळीस वर्षे मनात बाळगलेल गुपित अजून किती वर्षे तसेच ठेवायचे? आता आपण पंचाहत्तरी गाठली माधवला त्याच्या आईबद्दल सांगायला हवे. तो आपल्यालाच वडील समजत आहे. आयुष्यभर तिच्या वाट्याला आलेल्या भोगवटा शेवटी तरी मरताना तिला सुखाने मरू दे आणि मुंबई सेंट्रलला एस.टी. लागल्यावर गुरुजी उतरतात आणि कामाठीपुऱ्यात जातात. (वेश्या वस्तीचे सर्व वर्णन येथे केले आहे पण बिभत्स वाटत नाही इतक्या संयमाने केले आहे) आणि जमना त्यांचे स्वागत करते. जमनाही म्हातारी झालेली दिसते. ती दगडी आता येथे नाही तर, तिने गावा बाहेर चेंबूरला एका टेकडीवर महिलाश्रम काढला आहे व तेथे लघुउद्योग केंद्र चालविते अशी माहिती देते. गुरुजींना मनोमन आनंद होतो की, दगडी वेडातून शहाणी झाली तिला हरवलेली दिशा सापडली दगडी डगमगली नाही. नरकात राहून लढाई जिंकली.

गुरुजी तिला भेटण्यासाठी निघतात. त्यांना चैत्यभूमीचे दर्शन घ्यायचे असते ६ डिसेंबर वातावरण पूर्ण आंबेडकरीमय झालेलं. दोन महिन्याच्या बाळापासून ते मृत्यूच्या कुशीत शिरू पाहणाऱ्या म्हाताऱ्यापर्यंत दर्शनासाठी संपूर्ण महाराष्ट्रातून आलेला अफाट जनसमुदाय पवार गुरुजीही त्या गर्दीत मिसळले गेले ते अवाक् होऊन पाहत होते. निरनिराळ्या ठिकाणी सभेसाठी मंच उभारलेले दलित पँथर, रिपब्लिकन, मुक्तिसेना साऱ्यांची भाषणे जोर जोरात सुरूहोती. येणाऱ्या भीमअनुयांना पाणी, जेवणाची सोय दिसत होती. त्यांना राहूलची आठवण झाली. राहूल माधवचा मुलगा तो ही पुढारी झालेला. त्याची भेट होत नाही. गुरुजींना दगडीला भेटण्याची ओढ लागली होती आणि समोरून एका मिरवणुकीचे नेतृत्त्व करीत दगडी हातात निळा झेंडा घेऊन एक हात वर करून घोषणा देत होती.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर... झिंदाबाद! गुरुजींनी पाहिले वय झालेली म्हातारी सुरकुत्या तोंडावर पसरलेल्या केस सफेद झालेले पण चेहऱ्यावरचा तो पूर्वीचाच दिमाख कायम होता. दोघांचे बोलणे विचारपूस होते. डोळ्यातून अश्रूंचा बांध मोकळा होतो. माधवची, राहूलची चौकशी झाल्यावर बरोबरच्या बाया अचंबीत होतात. दगडा सारखं काळीज असलेल्या या बाईला हा माणूस भेटल्याबरोबर कसं रडू फुटलं, याचाच विचार करत होत्या.

दगडी गुरुजींना म्हणते, वाटेत हौसाचं एक काम करू मग जाऊ आणि हौसाच्या झोपडीवर दगडीने धक्का मारला हौसाच्या नवऱ्याने दार उघडलेच नाही तीन-चार लाथा घातल्या, आवाज दिला तेव्हा कुठे त्याने झोकांड्या खात दार उघडले. कौन है? म्हटल्यावर दगडी गरजली तुझी आय त्याच्या थोबाडीत धाडदिशी वाजवली त्याच्या सोबत एक तरुणी होती ती उठली. दगडीने तिला ओळखले. सुंदरे कामाठी पुऱ्यातील धंदा सोडून दुसऱ्याचा संसार मोडायला आलीस काय इथ? तीने मावशी मला माफ कर असं विनवलं हौसेच्या नवऱ्याने दगडीचे पाय धरले. हे सगळ गुरुजींना नवं असलं तरी दगडीच्या ते अंगवळणी पडलं होतं. हौसाच्याच घरी तिला रात्र काढायला सांगितली. रात्री १२ वाजता कुठं जाणार याची जाणीवही दगडीला होते. सगळ्यांनी रात्र तिथेच काढली आणि सकाळी चेंबूरला आश्रमात गेले. दगडी मुलाच्या सोन्यासारख्या संसारात जायला नको म्हणते. गुरुजी तिला म्हणतात, अग तू तर मोठ्या समाजसुधारकांपेक्षाही किती चांगली कामे करतेस, पण तुझं अडाणी तत्त्वज्ञान आहे तसचं आहे. तिचा महिलाश्रम म्हणजे बऱ्यापैकी पाच झोपड्या तेथे पिंपळाच्या सावलीत पाच पाच बायकांचा एक गट वेगवेगळी कामे करण्यात गर्ग येथे दगडी मानवतावादी विचार अनुभवातून मांडते. गुरुजी, ज्याला जाळातच ढकललं त्याला चटक्याचा तरास कळतो. मी जळल्ये, भाजल्ये, होरपळल्ये या पोरींनी त्या वणव्यात जाऊ नाय. त्यांनी आपली अब्रू विकू नाय. यांनी घाम गाळावा, कष्ट करावं अन् आपलं पोटं भराव.. त्या नरकापासून, त्यांना लांब ठेवण्यासाठी मी धडपडत्ये. माझ्या धडपडीस यश येईल असं वाटतं गुरुजी या विचाराने चक्रावून जातात. गुरुजींना वाटतं आपण आयुष्यभर शाळेतली पोरं हाकत आलो. शिक्षण तिसरा डोळा! दगडी किती किती महान होती. त्यांना दगडी आभाळाएवढी दिसू लागली. विचारात गढलेल्या गुरुजींला दगडी भानावर आणते. गुरुजी म्हणतात मास्तर मी होतो का तू? दगडी म्हणते तुमीच होता की,



मी आपली आडाणी दगड रात्रीच्या साळंत शिकवताना तुमीच म्हणाला व्हताना, दगडी तू नावा परमाणं दगड आहेस दगड. असे तरुणपण एकत्रं घालवलं नाही आता म्हातारपण तरी एकत्र घालवू असा विचार बोलून दाखवतात. तीन चार दिवस आश्रमात राहतात. गुरुजी गेल्यावर दगडी एकटीच चांदण्यांनी भरलेलं आकाश पाहता पाहता भूतकाळात आपल्या गांवच्या आठवणीत गढून गेली.

राजणगांव भागूजी त्याची बायको राधा त्यांची मुलगी दगडी रात्रीच्या शाळेत पवार गुरुजींकडे शिकायला जात पवार गुरुजी सातान्याकडचे महारवस्तीत राहून लोकांना आंबेडकरांविषयी सांगत. हळू हळू त्यांना दगडी आवडायला लागली होती. दुष्काळ पडतो. दुष्काळात भागूजीचे निधन होते. राधाला पवार गुरुजी व दगडीच्या जवळकीचा संशय येतो ती गरिबीचे जीवन जगत असते पण इज्जतीला घाबरत असते. खरं तर पवार गुरुजी दगडीशी लग्न करणार असतात पण त्यांच्या मोठ्या बहिणींची लग्न झाल्यावर तो पर्यंत ते हे प्रेमही व्यक्त करीत नाही आणि दगडीचं गुरुजींकडे जाणं बंद केलं जातं. याच गावातील अनसा नावाच्या विधवेचा मुलगा दौलत हा मुंबईला काम करतो व शिकतही असतो. अनसाबाई आणि राधा नणंद भावजयांसारख राहत भागूजी मेल्यावर राधेला अन् दगडीला आधार मिळतो. दौलतला दगडी दादा म्हणते असते. त्याच गावात रावसाहेब नावाचा रंगेल पाटील त्यांची प्रेमळ सोज्वळ बायको सुगंधा शिकलेली गुणी घरंदाज असते. गांव तिला वयनीसायब म्हणून मान देतात. दौलत नेहमी पत्रातून गुरुजींशी संवाद साधतो व आंबेडकरी चळवळीबद्दल, नामांतराबद्दल लिहीत असतो. गुरुजी व दौलत यांच्या माध्यमातून सगळ्यांना डॉ.बाबासाहेब आंबेडकर कळतात. रावसाहेबांची वाईट नजर दगडीवर पडते. तिच्यावर अतिप्रसंग करण्याचा डाव वयनीसाब उधळून लावतात. चिडलेला रावसाहेब हंटरने बायकोला मारतो. पंचवीस वर्षे झालेली मुलबाळं नाही ह्या दुःखात असलेली माउली आपल्या वडिलांच्या नावाला बट्टा लागू नये म्हणून सहन करत राहते.

मधल्या काळात दौलत आपल्या मित्राचं गुलाब काळेच स्थळ दगडीला आणतो गुरुजीला हे कळतं त्यांच पत्र दौलतला मिळत नाही. त्या आधीच दगडीचं लग्न मुंबईच्या गुलाब काळेशी होते. दगडी सुखात असते पण मनात कुढते तिच्या मनात गुरुजींच प्रेम असतं पण नियतीपुढे काहीच चालत नाही. दोन एक वर्ष सुखाची जातात. सासू आहे, सासरा नाही अशी तीनच माणसं गावातून एकदम मुंबईतील सगळ्या गोष्टी अंगवळणी पडता पडता एक दिवस

काळ घाला घालतो. गुलाबचा रेल्वेतून पडून अपघाती मृत्यू होतो. सासू तिला पांढऱ्या पायाची म्हणून हाकलते. दगडी परत रांजणगांवला येते. राधाचेही निधन होतं दगडी अनसाकडे राहते. थोड्याच दिवसात कळतं दगडी गरोदर आहे. लोक नांव ठेवतात विधवा बाई गरोदर, अनसा पण दगडीला खोदून खोदून विचारते ती रानात रावसाहेबांच्या तावडीतून सुटली तो प्रसंग अनसाला आठवतो पण दगडी सांगते नाही मी पवित्र आहे. वयनीसायबांनी मला वाचवलं होतं हे बाळ आमच्या प्रेमाच आमच्या नवराबायकोच्या सहवासातीलच आहे. मी त्याला वाढवणार शिकवणार असं ती धीराने बोलते.

गावात काही वाईट माणसंही असतात. शंकर महार त्यातील एक त्याची मुलगी तारा वाया गेलेली मुलगी दोघे मिळून जात पंचायत बसवतात. सुगंधा वहिनी न्यायनिवाडा करतात. दगडीच्या पाठीशी उभ्या राहतात. नवऱ्या विरुद्ध आवाज उठवतात. त्यानंतर रावसाहेब आपल्या पत्नीला मारून विहिरीत टाकतो. त्यांचा मृत्यू होतो. शंकर गांव सोडून जातो व सूडाच्या भावनेने पेटून उठतो. इकडे दगडीला मुलगा होतो. चार पाच महिने होतात. शंकर मुंबईवरून एका माणसाला घेऊन येतो तो तिच्या सासूचा लांबचा भाऊ म्हणुन ओळख सांगतो व घ्यायला आलो म्हणून मुंबईला नेतो. पण घरी न नेता कामाठीपुऱ्यात वेश्याव्यवसायाची मालकीन चंपा मौसीला विकतो. येथे तिच्या जीवनाची फरपट सुरू होते.

इकडे कामाठीपुऱ्यात ज्युडो कराटे शिकवायला एक जपानी बाई आली तिचं खरं नांव कुणालाच माहित नव्हतं. तिच्या निळ्या डोळ्यावरून तिला सगळे निलूताई म्हणत. दगडी ज्युडो कराटे शिकते आणि तिच्यात मेलेला आत्मविश्वास पुन्हा जागा होतो. टपलेल्या गुंड गिधाडांवर ती वीजेसारखी तुटून पडते. एक दिवस चंपाचा खून होतो. सगळ्यांची जबाबदारी दगडीवर येते. अशीच एक मुलगी गावावरून फसवून आणली जाते. दगडी तिला पैसे देऊन परत पाठवते. जमना व हेमाला विचार पडतो असं केलं तर कस होणार पण दगडी निश्चय करते व कोठा विकून स्वाभिमानाचे जीवन जगायला सुरूवात करते. ह्या विचारातून ती बाहेर पडते. बरीच रात्र झालेली असते. ती गुरुजींबरोबर जायला तयार होते. माधव आता नामांकित कॉलेजमध्ये प्राध्यापक असतो. सूनबाई शाळेत शिक्षिका नातू राहुल चळवळीत पुढारी होतो. मराठवाडा विद्यापीठाला डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ असे नामांतर होते.



त्याला अटक होते पण सुटकाही होते. माधव व सूनबाई दगडीला आईच्या रूपात स्वीकारत नाही. राहूल मात्र खूप खूष असतो. गुरुजींकडून सगळी गोष्ट समजल्यावर तो आपल्या आजीच्या कतृत्त्वापुढे नम्र होतो. थोडे दिवस दगडी तेथे रहाते. पण उच्चभ्रू वातावरणात आपला मुलगा व सून आपले नाहीत याची जाणीव होऊन ती पुन्हा मुंबईला जाते. पण जाताना घराबाहेर एकटी पडत नाही तर गुरुजीही असतात. हे राहुलला कळल्यावर तोही घर सोडतो व मुंबईला या दोघांना भेटतो. पण दगडी मूक होते. राहुल तिला आई म्हणून हाका मारतो आणि माझं लेकरू मला भेटलं! अस म्हणून राहुलच्या कानशिलांवरून बोटे मोडते तिच्या चेहऱ्यावरून आनंद ओसंडून वाहतो. आश्रमातील भगिनी आनंदून जातात. पवार गुरुजी स्वतःशीच म्हणाले, होय दगडी बोलायला लागलीय आई हा शब्द ऐकण्यासाठी ती आयुष्यभर तळमळत होती. आई या दोन अक्षरांनीच तिची गेलेली वाचा परत दिली. राहूलच्या प्रेमाने ओथंबलेल्या त्या हाकेनं तिचे ओठ नकळत विलग झाले. ती बोलू लागली.

तुलना :-

इथे फुलांना मरण जन्मता यामधील रमा आध्यात्मिक मठात असून, आपल्यावर काबू करू शकली नाही. वासनेला बळी गेली केवळ पुरुषसत्तेचा सूड उगवण्यासाठी स्वतःचे आयुष्य संपवून टाकते. तर चक्रीमधील दगडी कामाठीपुऱ्यात वासनेच्या वखवखलेल्या माणसांमध्ये राहून मनाने शुद्ध राहिली. केवढा हा विरोधाभास दोघीही पुरुषप्रधान संस्कृतीच्याच बळी.

**भाषाशैली :**

चक्रीमध्ये ग्रामीण, नागर, मिश्र भाषा दिसते. दलित भाषा दिसते अनेक संवादामधून जीवनावर भाष्य केलेले दिसते. उदा.माधव आईला स्वीकारत नाही याला गुरुजी स्वतः जबाबदार समजतात. माझचं काही चुकलं असाव. पाहिजे तसे संस्कार करता आले नसावेत. गुरुजी तुमचं काय बी चुकल नाय. कवा कवा झाडाला फळ कसं येईल ते झाड वाढवणाऱ्या माळ्याला बी कळत नाय. त्यात गुरुजी तुमी तरी काय करू शकला असता? हेमाला दगडी गावातील गोष्टी सांगताना पवार गुरुजी विषयी सांगते. महार असल्याचं सांगते. हेमा तर ब्राम्हण जातीतून आलेली तेव्हा हेमा म्हणते, सर्व धर्म समभाव सर्व जाती सम

भाव। कोणी कोणाच्या धर्माचा द्वेष करीत नाही. कोणी कोणाच्या जातीला श्रेष्ठ कनिष्ठ मानत नाही. सगळी समानता। कोणत्या राजकारण्याला खऱ्या अर्थाने समानता पाहायची असेल तर त्यांनी इथली समानता पहावी. आपली जात एकच बाईची! उपरोधित शैलीत जातीयतेचे बोलके उदाहरण यात दिसते.

**इथे फुलांना .... भाषा शैली**

ग्रामीण बोलीचा वापर मधे मधे केलेला दिसतो. संपूर्ण कादंबरी प्रमाण भाषेत प्रथम पुरुषी निवेदन आहे. गरिबीचे बोलके विचार, आमच घर म्हणजे अन्नधान्य सोडून खाली सर्वांनी भरलेलं दुःख, वैताग, विवंचना अन् कर्ज त्यामुळे निदान एक दिवसाआड तरी उपवास घडत असे. पाप पुण्याचं गणित सार जग पापानं, अन्यायान आणि बळबजरीने भरलेले आहे. जिकडे तिकडे पापांचे हात लवथवताहेत. निष्पाप मनाचे लचके घेतले जात आहेत. असा भास होत होता. एक बाप आपल्या लाडक्या कन्येला तिच्या मनाविरुद्ध बळजबरीनं संसाराचा त्याग करायला सांगतो.

* * *